## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक-४६६, १०५८,१०५९,११०३ /२०२४ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
| --- | --- |
| सतीश केशव व्यास | सहाय्यक निबंधक, गृहनिर्माण, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे-१,<br>उपनिबंधक, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय पुणे- १ |

(निर्णय दि.१९.०५.२०२६)

तक्रारदार यांनी दिनांक १४.६.२०२३, २५.७.२०२४, २०.८.२०२४, २.९.२०२४ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केले आहेत. तक्रारदार यांनी या तक्रार अर्जाद्वारे त्यांनी यापूर्वी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रार क्रमांक ८६, ८७, ८८, ८९, ९०, -२०१८ पुणे या प्रकरणी राज्य माहिती आयोगास सादर करण्यात आलेले शपथपत्र खोटे असल्याने त्यांचे विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

यासंदर्भात आयोगाच्या निर्देशानुसार जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास सविस्तर अहवाल सादर केला असून त्या अहवालामध्ये तक्रारदार यांना त्यांनी केलेल्या द्वितीय अपील प्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार १९५ पृष्ठाची माहिती दिल्याबाबत पुरावा दर्शक कागदपत्रे जोडले आहे. तसेच राज्य माहिती आयोगाच्या अंतरीम आदेशाचे निर्देशानुसार जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी शपथ पत्रावर अहवाल सादर केला असून त्यामध्ये तक्रारदार यांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध असलेली माहिती तक्रारदार यांना पुरवली असून त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारची माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याची खात्री करून अहवाल सादर केला आहे असे स्पष्ट केले आहे.

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी शपथ पत्रावर सादर केलेला अहवाल विचारात घेता तक्रारदार यांच्या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी वाजवी कार्यवाही केल्याचे स्पष्ट होते. तक्रारदार यांच्या तक्रार अर्जात नमूद करण्यात आलेल्या आर्थिक गैरव्यवहारा संदर्भात तक्रारदार,संबंधित विरुद्ध त्यांची तक्रार सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाखल करू शकतात. सदर वस्तुस्थिती विचारात घेता जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत असून सदर तक्रार प्रकरणी आयोगाच्या स्तरावर पुढे कार्यवाही अपेक्षित नाही या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचे तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक -४६६, १०५८,१०५९,११०३ /२०२४ /पुणे जावक क्र- 2596 दिनांक- 31/6/2026.